राज्यातील शासकीय मत्स्यबीज उत्पादन/ संवर्धन केंद्र व भाडेपट्टीने दिलेल्या शासकीय मत्स्यबीज उत्पादन/ संवर्धन केंद्रातून उत्पादित होणाऱ्या मत्स्यबीजांचे दर सुधारित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांक : मत्स्यवि २०२५/ प्र.क्र.१२७ /पदुम १३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई -४०० ०३२.
**दि. ०३ नोव्हेंबर, २०२५**

वाचा -

१. शासन निर्णय क्रमांक : मत्स्यवि २०२०/प्र.क्र.७४/पदुम १३ दि.०३/०६/२०२१
२. शासन शुध्दीपत्रक क्रमांक : मत्स्यवि २०२०/प्र.क्र.७४/पदुम १३ दि.०२९/७/२०२१
३. आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालयाचा प्रस्ताव दि.२५/०९/२०२५

प्रस्तावना :-

भूजलाशयीन क्षेत्रामध्ये मत्स्यव्यवसायास चालना देण्यासाठी मत्स्यशेतकरी, मत्स्य संवर्धक व मत्स्य कात्स्यकार यांना उत्तम प्रतीचे मत्स्यबीज पुरवठा करणे आवश्यक आहे. यासाठी शासनाने ३२ मत्स्यबीज उत्पादन केंद्र, २ कोळंबीबीज उत्पादन केंद्र, ३२ मत्स्यबीज संवर्धन केंद्र व १ कोंळबीबीज संवर्धन केंद्र याप्रमाणे ६७ केंद्रांची स्थापना केलेली आहे.

राज्याची मत्स्यबोटुकलीची गरज व शासकीय मत्स्यबीज उत्पादन/ संवर्धन केंद्रातून होणारे उत्पादन पुरेसे नसल्याने परराज्यांतून आयात केली जाते . आयात करण्यात येणारे मत्स्यबीज निकृष्ट दर्जाचे तसेच मरतूक (Mortality Rate) जास्त प्रमाणात होणारे असल्याने राज्यात उत्पादित होणाऱ्या मत्स्यबीजांची जास्तीत जास्त विक्री होण्याच्या दृष्टीने व परराज्यातून होणारी आयात कमी व्हावी या उद्देशाने मत्स्यबीजांच्या विक्री दरात वाचा क्र.१ व २ येथे नमूद शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आली होती.

सद्यस्थितीत शासकीय मत्स्यबीज केंद्रांमधून मत्स्यजिरे/मत्स्यबीज / मत्स्यबोटुकली उत्पादनाकरीता केंद्रातील तलाव बांधबंदिस्ती/नुतनीकरण, संचयन, संवर्धन व संगोपन तलावांची पूर्वमशागत, खत-खाद्य, प्रजनक, मत्स्यखाद्य, मनुष्यबळ इत्यादीवर होणारा खर्च जास्त असल्याने मत्स्यजिरे/मत्स्यबीज व मत्स्यबोटुकलीचे दरांमध्ये सुधारणा होणेकरिता वाचा क्र.३ अन्वये आयुक्त कार्यालयाने शासनास प्रस्ताव सादर केला आहे .

याबाबत राज्यातील मत्स्यबीज उत्पादकांनी दिलेली निवेदने व केलेली मागणी विचारात घेवून याबाबत विचारविमर्श होऊन राज्यात उत्पादित होणाऱ्या गुणवत्तापुर्ण मत्स्यबीजाची जास्तीत जास्त विक्री होण्याच्या दृष्टीने व राज्यातील मत्स्यबीज केंद्र स्वयंपूर्ण होणाच्या दृष्टीने राज्यातील शासकीय मत्स्यबीज उत्पादन/ संवर्धन केंद्र व भाडेपट्टीने दिलेल्या मत्स्यबीज उत्पादन/ संवर्धन केंद्रातून उत्पादित होणाऱ्या मत्स्यबीजांचे दरात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

आता शासन या निर्णयाद्वारे यापुर्वी वाचा क्र.१ व २ अन्वये निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णय अधिक्रमित करून राज्यातील शासकीय मत्स्यबीज उत्पादन/ संवर्धन केंद्र व भाडेपट्टीने दिलेल्या मत्स्यबीज उत्पादन/ संवर्धन केंद्रातून उत्पादित होणाऱ्या मत्स्यबीजांचे विक्रीचे दर खालील प्रमाणे नमूद अटी व शर्तीसह सुधारित करण्यास मान्यता देत आहे.

| अ.क्र. | प्रजाती | Spwan per lakh (In Rs.) | Early Fry (20-30 mm) per 1000 Nos (In Rs.) | Fry (31-40 mm) per 1000 Nos (In Rs.) | Advanced Fry (41-60 mm) per 1000 Nos (In Rs.) | Fingerlings (61-100 mm) per piece (In Rs.) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | Jayanti Rohu | ८०० | २०० | ५०० | २००० | ५ |
| २ | Improved Catla | १२०० | ३०० | ५०० | २५०० | ५ |
| ३ | Amur common carp | १५०० | ३५० | ५५० | २५०० | ६ |
| ४ | Mrigal | ६०० | ३०० | ३५० | १००० | ३ |
| ५ | Puntius Spp | ६०० | ३५० | ५५० | २५०० | ५ |
| ६ | Grass carp | १५०० | ३५० | ५५० | २५०० | ५ |
| ७ | Labeo Bata | ६०० | ३५० | ५०० | ३००० | ४ |
| ८ | B.Belangiri | - | ३५० | ५५० | - | ४ |
| ९ | Freshwater Prawn (SCAMP) | - | - | - | २००० | - |
| १० | Koi Carp | १००० | ३०० | ५०० | | ४ |

| अ.क्र | प्रजाती प्रती नग | मत्स्यजिरे (प्रती लक्ष) (०८ ते १२ मि.मि) (दर रुपयात) | मत्स्यबीज (प्रती हजार) (२०ते२५ मि.मि) (दर रुपयात) | अर्धबोटुकली (प्रती हजार) २५ते४० मि.मि) /(दर रुपयात) | बोटुकली (प्रती हजार) (५०ते६० मि.मि) (दर रुपयात) | प्रगत बोटुकली (प्रती हजार) (६०ते ७०मि.मि चे वर) (दर रुपयात) | इयरलिंग १०० मि.मि चे वर प्रती नग (दर रुपयात) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्रमुख कार्प (मिश्र) | १५०० | ३०० | ४५० | १३०० | ३००० | ५ |
| २. | रोहू | १२०० | ३०० | ४५० | १००० | ३००० | ४ |
| ३. | सायप्रिनस | १५०० | ३५० | ५०० | १५०० | ३००० | १६-२० |
| ४. | कटला | १५०० | ३५० | ५०० | १५०० | ३००० | ५ |

| अ.क्र. | प्रजाती | मत्स्यजिरे *(लाखात)* | ९-२० mm | २१-३५ mm | ३६-५० mm | ५१-८० mm | ८१-१२० mm |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पंगेशियस | - | ८०० | ८०० | १५०० | २००० | ३००० |
| २ | गिफ्ट तिलापिया | - | १००० | २००० | ३००० | ४५०० | ७००० |

१. राज्यातील मत्स्यव्यवसायिक सहकारी संस्था, खाजगी व्यवसायिक व इतर शेततळी धारक हे शासकीय मत्स्यबीज केंद्र व शासन मालकीच्या भाडेपट्टीने देण्यात आलेल्या केंद्रामधून मत्स्यबीज/मत्स्यबोटुकलीची खरेदी करतील . याकरिता संबंधित जिल्ह्यातील सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी संवर्धकांना याबाबत प्रचार, प्रसार व प्रोत्सहित करावे.

२. शासकीय मत्स्यबीज केंद्रावर नियोजनाप्रमाणे विक्रिसाठी उपलब्ध होऊ शकणाऱ्या मत्स्यबीजाबाबत माहिती ठेकेदार यांनी संबंधित जिल्ह्यातील सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांना दरवर्षी ३१ जून पर्यंत कळवावी. त्यानुसार जिल्ह्यातील मत्स्यव्यवसाय ठेकेदार/सहकारी संस्था/ मत्स्यसंवर्धक यांचेकडून प्राप्त मागणी व पुरवठ्याचे नियोजन संबंधित सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी जिल्ह्यातील मत्स्यबीज केंद्र ठेकेदार यांचेशी समन्वयाने करावे. सदर मत्स्यबीज पुरवठ्याचा तिमाही अहवाल संबधित ठेकेदार यांचेकडून प्राप्त करुन संबंधित सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी आयुक्त मत्स्यव्यवसाय यांना सादर करावा.

३. उपरोक्तपणे नमुद मत्स्यबीज विक्रीचे दर हे केवळ शासकीय मत्स्यबीज उत्पादन/संवर्धन केंद्र, खाजगी विकासकांना जी मत्स्यबीज उत्पादन/संवर्धन केंद्र भाडेपट्टीने देण्यात आलेली आहेत त्याकरीताच लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

कि.म.जकाते
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री (मत्स्यव्यवसाय) यांचे खाजगी सचिव.
२. सचिव (पदुम) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय , मुंबई .

३. आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५. सह आयुक्त मत्स्यव्यवसाय (भूजल /निमखारे)
६. प्रादेशिक उपायुक्त मत्स्यव्यवसाय मुंबई /पुणे/ नाशिक /छत्रपती संभाजीनगर/लातूर/ अमरावती /नागपूर
७. सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय (सर्व जिल्हे )
८. निवडनस्ती (कार्यासन पदुम-१३).